जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 14 ऑक्टोबर 2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 27 ऑक्टोबर 2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 14 नोव्हेंबर 2020.
7. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 15 नोव्हेंबर 2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 27 नोव्हेंबर 2020.
9. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 01 डिसेंबर 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 14 /12 /2020.

**विषयः- उस्मानाबाद जिल्हयामध्ये लॉकडाऊनच्या कालावधीत धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे येथील यात्रा/उत्सव यांबाबत.**

**आदेशः-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 8 चे अनुषंगाने संदर्भ क्र. 9 अन्वये उस्मानाबाद जिल्ह्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 31 डिसेंबर 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून या कार्यालयाने यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश दि. 31 डिसेंबर 2020 पर्यंत लागू आहेत.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कन्टेन्मेंट झोन (Containment Zone) च्या बाहेरील क्षेत्रामध्ये ठराविक उपक्रम/बाबी पुन्हा चालू करण्याबाबत संदर्भ क्र. 6 अन्वये पारित केलेल्या आदेशानुसार संदर्भ क्र. 7 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केलेला असून संदर्भ क्र. 7 नुसार उस्मानाबाद जिल्ह्यातील कन्टेन्मेंट झोन (Containment Zone) च्या बाहेरील क्षेत्रामध्ये धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे पुन्हा चालू करणेबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.



Scanned by CamScanner

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्हयातील विविध धार्मिक देवस्थान ट्रस्ट यांचेकडून धार्मिक स्थळ/प्रार्थनास्थळ येथील यात्रा/उत्सव यांना परवानगी मिळणेबाबत विनंती निवेदने या कार्यालयास प्राप्त झाली आहेत.

त्याअर्थी मी कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्हयातील करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून लॉकडाऊनच्या वाढविलेल्या कालावधीत महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्र. 6 च्या आदेशाचे परिशिष्ट अ अन्वये दिलेल्या **मार्गदर्शक सूचना (SOP) विचारात घेऊन उस्मानाबाद जिल्हयामध्ये लॉकडाऊनच्या कालावधीत धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे येथील यात्रा/उत्सव यांबाबत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.**

1. महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र. 6 मध्ये नमूद आदेशाचे परिशिष्ट अ मधील मुद्दा क्र. 4 (xv) नुसार धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे यांना मोठी संमेलन/मेळावे घेण्यास प्रतिबंध करण्यात आलेला असल्याने **धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे यांना अनियंत्रित गर्दी होईल असे मोठे मेळावे/संमेलने/यात्रा/उत्सव यांचे आयोजन करण्यास परवानगी असणार नाही.** तथापि धार्मिक विधी, कुळाचाराचे पालन करण्यास परवानगी राहील. यावेळी एका ठिकाणी सभा, समारंभ इ. करीता अनुज्ञेय लोकांची संख्या याचे पालन करणे अनिवार्य राहील.
2. महाराष्ट्र शासनाचे संदर्भ क्र. 6 मध्ये नमूद आदेशानुसार संदर्भ क्र. 7 च्या या कार्यालयाच्या आदेशान्वये उस्मानाबाद जिल्हयातील कन्टेन्मेंट झोनच्या बाहेरील क्षेत्रातील धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे पुन्हा चालू करण्यास परवानगी दिलेली आहे. तसेच संदर्भ क्र. 7 च्या आदेशाचे परिशिष्ट अ मध्ये धार्मिक स्थळे/प्रार्थनास्थळे याठिकाणी कोविड-19 चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत प्रमाणित कार्यपद्धती (SOP) जारी करण्यात आलेली आहे. या परिशिष्ट अ मध्ये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 ते 60, महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम 2020 चे नियम 11, साथरोग अधिनियम 1897 तसेच भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 व इतर लागू होणा-या कायदेशीर तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

(कौस्तुभ दिवेगावकर)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.

2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.



Scanned by CamScanner

5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा क्रीडा अधिकारी, उस्मानाबाद.
7. विभाग नियंत्रक, रा. प. उस्मानाबाद.
8. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
9. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
10. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
11. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
12. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
13. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
14. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
15. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
16. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner